पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/०६/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१९/०६/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
६) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
८) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) सभा आयोजनाबाबत – मा.समीर मासुळकर, मा.सौ.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) कामामध्ये बदल करणेबाबत – मा.वसंत लोंढे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील काही महसुली कामांना अंदाजपत्रकीय रक्कम वाढविणेबाबत – मा.सौ.शकुंतला बनसोडे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०५/१२/२०१४ व १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ०२/०१/२०१५, १६/०१/२०१५ व ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.१०**) सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ड) दिनांक १६/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ११)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक ३१/०१/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

फ) दिनांक ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १३)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ग) दिनांक २०/०२/२०१५, ०३/०३/२०१५(स.१०.४५ व दु.२.०० वा), २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ह) दिनांक २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ई) दिनांक ०४/०४/२०१५ व १७/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

छ) दिनांक ०२/०५/२०१५, ०५/०५/२०१५, १५/०५/२०१५ व ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १७)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ज) दिनांक ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १८)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ९५ विषय क्रमांक : १

दिनांक : १९/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४९/१२६/२०१५, दि.१९/०५/२०१५

विषय - प्रभाग क्र.१७ श्री ज्ञानेश्वर उद्यानातील सिमाभिंतीचे नुतनीकरण करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९६ विषय क्रमांक : २

दिनांक : १९/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/४९२/२०१५, दि.१०/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील जुने/भंगार/निरुपयोगी भंगार साहित्य नेहरुनगर येथील गोडावून व अन्य ठिकाणी जमा करुन ठेवणेत आलेले आहे. सदर साहित्य निरुपयोगी झालेले असून फेरवापरास अयोग्य असल्याचे संबंधित विभाग प्रमुख यांनी प्रमाणीत केलेले आहे. प्रस्तुत साहित्याचे अंदाजे विक्रीमुल्य निश्चित करण्यात आलेले आहे. उपरोक्त सर्व विभागाकडील भंगार साहित्याचे एकूण अंदाजे विक्रीमुल्य र.रु.१,६९,३२,९६०/- इतकी येत आहे. प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढणेत आलेली आहे. प्रस्तुतच्या अंदाजे किंमती पेक्षा उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विल्हेवाट खुल्या लिलावाने करणे प्रस्तावित आहे. सबब उपरोक्त भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.१,६९,३२,९६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणसत्तर लाख बत्तीस हजार नऊशे साठ फक्त) इतकी येत आहे. सदरची किंमत र.रु.५००/- पेक्षा जास्त असल्याने त्या साहित्याची विल्हेवाट जाहीर लिलाव करुन लावणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ९७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १९/०६/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

मा.विधी समितीची पुढील दिनांक ०३/०७/२०१५ ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १७/०७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता व शुक्रवार दिनांक १७/०७/२०१५ ची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक ३०/०७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करणेस मान्यत देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १९/०६/२०१५

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील सर्व्हे नं.५९ व सर्व्हे नं.१२१ पर्यंत संरक्षण हद्दीलगत १८.०० मी.रुंद डी.पी.रस्ता विकसीत करणे ( निविदा क्र.०१/०१/२०१४-१५ ) चे काम संरक्षण हद्दीलगत सद्यस्थितीत बंद असून सदर ठिकाणी काम करणेस संरक्षण विभागाने हरकत घेतली आहे. त्यामुळे सदरचे काम ६ ते ७ महिन्यांपासून बंद आहे. पावसाळयात अल्को सोसायटी येथे पाणी साचत असून त्यामुळे सदर भागातील नागरिकांना त्रास होत आहे. तसेच पुर्वा रेसीडेन्सी येथे ओपन नाल्याबाबत नागरिकांना त्रास होत असून सदर भागातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्याबाबत तेथील नागरिक नाला बंदिस्त करणेबाबत वारंवार तक्रार करीत आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होणेचे दृष्टीने विषयांकित कामाअंतर्गत अल्को सोसायटी ते झरवरी रोड पर्यंत स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे, व पुर्वा रेसीडेन्सी व साई वास्तू येथील नाल्यात बंद पाईप टाकून नाला बंदिस्त करणे गरजेचे आहे. तसेच प्रभाग क्र.५५ मधील विकास आराखडयातील ठिकठिकाणचे नियोजीत रस्ते विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १९/०६/२०१५

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक : मा.समीर मासुळकर

संदर्भ : मा.शकुंतला बनसोडे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव –

मनपाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक प्रसिध्द झाले असून अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असलेल्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील आवश्यक कामांच निविदा काढणेबाबतची कार्यवाही चालू आहे. तथापि अंदाजपत्रक ३ मधील पान क्र.६८३ अ.क्र.१ ते १५ मध्ये नमुद केलेली कामे ही पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील मैलाशुध्दीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीविषयक, महसुली कामे आहेत. सदर कामांना आवश्यकतेनुसार सन २०१४-१५ चा सुधारित अंदाज व सन २०१५-१६ चा अंदाज या रकमा नमुद करणेत आलेल्या आहेत.

तथापि कामाची अंदाजपत्रकीय रक्कम शुन्य (०) अशी अंदाजपत्रकामध्ये आलेली आहे. त्यापैकी अ.क्र.१, २ व ६ चे चालू असलेल्या कामांच्या देखभाल, दुरुस्तीची मुदत यावर्षी संपत असलेने सदर कामांच्या निविदा काढणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामांना अंदाजपत्रकीय रक्कम असणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक ३ मधील पान क्रमांक ६८३ अ.क्र.१, २ व ६ वरील अनुक्रमे आकुर्डी, रावेत व कासारवाडी येथील मैलाशुध्दीकरण केंद्रांचे देखभाल दुरुस्तीची कामे करणे या कामांना प्रत्येकी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,००,००,०००/- ( अक्षरी र.रु.तीन कोटी फक्त) रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८९/२०१५
दिनांक : २२/०६/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.